ला. प्र. वि.

**पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा यांचे कार्यालय सिटी सर्व्हे नं.५२४,**
**जिल्हा न्यायालयासमोर सदरबझार, कॅम्प सातारा.**

**प्रेसनोट - दिनांक ०२/०७/२०२४**

**श्री. दिलीप महादेव नाझीरकर, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशु वैद्यकीय, जिल्हा परिषद, सातारा यांचे विरूद्ध अपसंपदेचा गुन्हा दाखल.**

| | | |
|---|---|---|
| १ | **ला.प्र.वि.कार्यालय** | **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा** |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.नं. ६९०/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३(१)(ई) सह १३(२) तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक सुधारित अधिनियम २०१८ चे कलम १३(१)(ब) सह १३(२) अन्वये. |
| ३ | **आरोपी नाव** | श्री.दिलीप महादेव नाझीरकर, वय ५५ वर्षे, पद- सहा. पशुधन विकास अधिकारी, डॉक्टर, वर्ग- ३ पशुसंवर्धन वैद्यकिय दवाखाना, श्रेणी-२ बरड, ता फलटण जि सातारा रा. फ्लॅट नं. १६, नारायण अपार्टमेंट, चिंचकर इस्टेट, टी.सी कॉलेजच्या पाठीमागे, बारामती ता.बारामती, जि.पुणे |
| ४ | **एकूण मालमत्ता** | **३४,५२,७३६/- रूपये** |
| ५ | **एकूण खर्च** | **४३,०५,४९७/- रूपये** |
| ६ | **एकूण उत्पन्न** | **६१,७४,०६२/- रूपये** |
| ७ | **अपसंपदा रक्कम** | **१५,८४,१७१/- रूपये.** |
| ८ | **परिक्षण कालावधी** | दिनांक ११/०६/२०११ ते दिनांक ०७/०९/२०१९ पर्यत. |
| ६ | **थोडक्यात हकिकत** | नमुद आलोसे श्री.दिलीप महादेव नाझीरकर यांचे विरूद्ध लाप्रवि, सातारा येथे सुरू असलेल्या उघड चौकशीमध्ये त्यांनी दि. ११/०६/२०११ ते दि. ०७/०९/२०१९ या परिक्षण कालावधीमध्ये आपले पदाचा व अधिकाराचा गैरवापर करून ज्ञातस्त्रोतापेक्षा त्यांचे स्वताची एकुण १५,८४,१७१/- रूपये किंमतीची अपसंपदा **(एकुण उत्पन्नाच्या २५.७ टक्के)** गैरमार्गाने संपादीत केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरून पोलीस निरीक्षक श्री विक्रम पवार, लाप्रवि, सातारा यांचे सरकारतर्फे फिर्यादीवरून वर नमुद आरोपी यांचेविरूद्ध अपसंपदा बाळगल्या प्रकरणी फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.नं ६९०/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३(१)(ई) सह १३(२) तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक सुधारित अधिनियम २०१८ चे कलम १३(१)(ब) सह १३(२) अन्वये दिनांक ०२/०७/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| ७ | **तपासी अधिकारी** | पोलीस निरीक्षक सचिन अंकुश राऊत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा. |
| ८ | **मार्गदर्शन अधिकारी** | श्री राजेश वसंत वाघमारे, पोलीस उप अधीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, सि.स.नं. ५२४/अ,जिल्हा कोषागार कार्यालयाजवळ, सदरबझार, सातारा यांचे खालील संकेतस्थळ/ क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क :- मोबाईल ॲप** - www.acbmaharashtra.net **वेबसाईट** – www.acbmaharashtra.gov.in

**फेसबुक पेज** - www.facebook.com-maharashtraACB

**कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२१६२/२३८१३९ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४**

02/07/2024

**(राजेश वसंत वाघमारे)**
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सातारा
मो.नं.९५९४५३११००,९७६३४०६५००